सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४२ | गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com


## आजचे अभीष्टचिंतन





श्री. सुरेश गुरव
निवृत्त महसूल अधिकारी



श्री. विवेक पाटील
माजी नगरसेवक



श्री. भूपेंद्र पाटील
शिक्षक



श्री. चेतन शहा
अमळनेर



श्री. सुरेशजी वैष्णव
अमळनेर

# अमळनेरला बारावी परीक्षेवेळी 'डिजिटल कॉपी'मुळे खळबळ

## कडक बंदोबस्त असताना केंद्रांबाहेर गर्दी; पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नाशिक विभागातर्फे मंगळवार, दि. १० फेब्रुवारी पासून येथे बारावीची परीक्षा सुरू झाली आहे. या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्तीचे कडक आदेश लागू आहेत. मात्र, असे असताना शहरातील काही परीक्षा केंद्रांवर डिजिटल कॉपीचा नवा फंडा (शिक्षकाचा मोबाईल बाकावर ठेवून उत्तरे लिहिणे) वापरला जात असल्याचा प्रकार सुरू असल्याची चर्चा विद्यार्थ्यांमध्ये आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. पारंपरिक कागदी कॉपी पूर्णतः बंद झाल्याचे चित्र असताना हा प्रकार सुरू झाल्याने विद्यार्थ्यांसह पालकांत साशंकता व्यक्त होत आहे. मंगळवारी इंग्रजीच्या पहिल्याच पेपरवेळी परीक्षा केंद्रांवर कडक बंदोबस्त असताना केंद्राबाहेर मात्र पालकांची झालेली गर्दीही शहरात चर्चेचा विषय ठरली आहे.



यासंदर्भात प्राप्त माहितीनुसार शहरातील काही परीक्षा केंद्रांवर पेपर संपण्याच्या काही वेळ आधी परीक्षागृहातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद करण्यात आले. त्यानंतर शिक्षकांनी मोबाईलचा वापर करीत विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे सांगितली गेल्याची चर्चा आहे. तसेच स्वच्छतागृहात जाण्याच्या बहाण्याने बाहेर जाऊन शिक्षकांकडून फोनवर बोलणे, मेसेजिंग करणे तसेच प्रश्नपत्रिकेशी संबंधित माहितीची देवाणघेवाण करणे आदी प्रकार घडल्याचेही बोलले जात आहे. यामध्ये शिक्षकांकडून कॅमेऱ्यांच्या नजरेआड विविध इशारे करून विद्यार्थ्यांना उत्तरे सुचविण्याचे प्रकारही घडले आहेत.

दरम्यान, फक्त काठावर पास होण्याइतपत गुणांसाठी सहकार्य करा, अशा विनंत्याही काही पालकांकडून शिक्षकांना केल्या जात असल्याचे शहरात बोलले जात आहे. काही केंद्रांतील कर्मचाऱ्यांची परीक्षा काळातील ये-जा, प्रश्नपत्रिकेचे छायाचित्र काढून ती आत- बाहेर नेण्याचे प्रयत्नही झाल्याच्या चर्चांनी वातावरण तापले आहे. या सर्व प्रकारांमुळे परीक्षा प्रक्रियेच्या गोपनीयतेसह विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. बारावीच्या इंग्रजी पेपरवेळी तालुक्यातील सर्वच परीक्षा केंद्रांवर अत्यंत कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सीसीटीव्ही यंत्रणा, बैठे व फिरती पथके, ड्रोन कॅमेरे, व्हिडिओ शूटिंगही केली गेली. तसेच तालुकास्तरावर विशेष समितीमार्फत परीक्षा प्रक्रियेवर नजर ठेवण्यात येत होती. मात्र, डिजिटल कॉपीच्या नव्या फंडाच्या चर्चेमुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

> मंगळवारपासून बारावीची परीक्षा अतिशय भयमुक्त वातावरणात सुरू आहे. परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही टीव्ही नियंत्रण कक्षाला जोडलेले आहेत. काही ठिकाणी तांत्रिक अडचणी आलेल्या असल्याने त्या ठिकाणचा संबंधितांकडून लेखी खुलासा मागवला आहे. परीक्षा केंद्राबाहेर शंभर मीटरच्या परिसरात असलेल्या झेरॉक्स दुकानांवर कारवाई करण्याचे वरूनच आदेश आहेत. आज परीक्षा केंद्रांना भेट दिली असता कुठेही कॉपीचे प्रकार आढळले नाहीत. परीक्षा सुरळीत, शिस्तबद्ध व चोख बंदोबस्तात सुरू आहे. त्यामुळे खरोखर अभ्यास करणाऱ्या मुलांना नक्की न्याय मिळेल.
>
> **– प्रमोद पाटील, गटशिक्षण अधिकारी, अमळनेर.**

# श्री मंगळग्रह मंदिरात आज सामूहिक पारायण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सहा ते दुपारी चार वाजेदरम्यान सामूहिक पारायण होणार आहे. श्री मंगळग्रह मंदिर येथे विश्वात कोठेही नसलेली अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण श्री स्वामी समर्थांची अलौकिक प्रतिमा आहे. तसेच विश्वातील एकमात्र कमंडलूस्थित श्री गुरुदत्त व श्री अनघालक्ष्मी मातेचे मंदिर आहे. या पार्श्वभूमीवर या वर्षापासून मंदिर व्यवस्थापनाने दरवर्षी सामूहिक पारायणाचा कार्यक्रम घेण्याचे सुनिश्चित केले आहे. पारायणासाठी येणाऱ्या सर्व भाविकांसाठी नाश्ता व भोजन महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पारायणाला येणाऱ्या भाविकांनी सोबत आसन, गुरुचरित्र ग्रंथ, माळ व पाण्याची बाटली आणावी. पारायणासाठी नावनोंदणी करण्याची गरज नाही. जास्तीत जास्त भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे कळविण्यात आले आहे.









*अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथील वि. का. सोसायटीचे चेअरमन तथा माजी सरपंच बापूराव भिवसन महाजन यांनी आपल्या मातोश्री स्व. कमलबाई भिवसन महाजन यांच्या स्मरणार्थ गावातील श्री छत्रपती शिवाजी महाराज ध्येयपूर्ती अभ्यासिकेस स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ठरणारी संदर्भ पुस्तके भेट दिली. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी व महाजन यांचे कुटुंबीय.*

# मातोश्रींच्या स्मरणार्थ दिली अभ्यासिकेस स्पर्धा परीक्षेची पुस्तके

## शिरूडचा दशक्रिया विधी ठरला प्रेरणादायी | ग्रामीण विद्यार्थ्यांना मिळणार शैक्षणिक बळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथील वि. का. सोसायटीचे चेअरमन तथा माजी सरपंच बापूराव भिवसन महाजन यांनी आपल्या मातोश्री स्व. कमलबाई भिवसन महाजन यांच्या स्मरणार्थ गावातील श्री छत्रपती शिवाजी महाराज ध्येयपूर्ती अभ्यासिकेस स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ठरणारी संदर्भ पुस्तके भेट दिली आहेत. श्री. महाजन यांनी आपल्या मातोश्रींच्या दशक्रिया विधीचे निमित्त साधून केलेल्या या प्रेरक दातृत्वकार्याचे समाजातील सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध व्हावी, त्यांना अभ्यासासाठी योग्य मार्गदर्शन मिळावे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणताही विद्यार्थी मागे राहू नये, या उदात्त हेतूने श्री. महाजन यांनी हा अभिनव उपक्रम राबविला आहे. स्व. कमलबाई महाजन यांचे आयुष्य अतिशय कष्टमय, संस्कारमय व कुटुंबवत्सल राहिले. त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात आणि त्यांच्या नावाने समाजहिताचे कार्य घडावे, या भावनेतून कुटुंबीयांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक बळ देण्याचा हा निर्णय घेतला आहे.

बापूराव महाजन हे गावातील सामाजिक, शैक्षणिक तसेच विकासात्मक उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर राहतात. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेणे, शैक्षणिक उपक्रमांना पाठबळ देणे, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मदत करणे तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रमांत सक्रिय सहभाग नोंदविणे, ही त्यांची पंचक्रोशीत ओळख बनली आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांमध्ये समाधान व कृतज्ञतेची भावना व्यक्त केली असून, दशक्रिया विधीसारख्या पारंपरिक विधीला समाजोपयोगी कार्याची जोड देत श्री. महाजन यांनी गाव व परिसरात एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## दिनविशेष
१२ फेब्रुवारी

- दहशतवादाला अनुकूल असलेल्या हिंसक अतिरेकीवादाच्या प्रतिबंधासाठी आंतरराष्ट्रीय दिन
- पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हडेक्की (केरळ) प्रकल्प राष्ट्राला समर्पित केला.
- ध्वनीच्या दुप्पट वेग असलेल्या ब्रह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेण्यात आली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!


Mundada Foundation's

**SHRI. N.T MUNDADA GLOBAL VIEW SCHOOL**

Behind Civil Court, Near Water Tank, Amalner 425401
Jalgaon Dt. Ph: 02587 – 222202

**C.B.S.E. AFFILIATION NO. 1131481**

**Wanted Teachers**

Looking for Energetic and passionate Educators with Fluency in the English Language.

| Section | Subject | Eligibility |
|---|---|---|
| | Co-Ordinator | M.A./M.Sc. B.Ed |
| Pre -Primary | | Any Graduation with T.T.C / Montessori training / B.Ed. |
| Primary | English, Social Studies | M.A, B.Ed. |
| | Mathematics, Science | B.Sc./M.Sc., B.Ed. |
| Secondary | English, Social Studies Sanskrit, | M.A, B.Ed. |
| | Mathematics, Science | B.Sc./M. Sc., B.Ed |
| Non-Teaching | Aunty Watchman | S.S.C |

Your application will be much appreciated fulfilling the following criteria.

- Passport size photographs
- Complete Resume
- Minimum 2 years of experience
- English Fluency is Must
- Experience Certificate mentioning last drawn salary
- Salary will not be a constraint for the deserving candidates
- CBSE Experience is compulsory

* Handwritten Application
* Original Certificate
* Computer Knowledge

Date of Interview: 15/02/2026
Time 9.15am onwards

Venue: Shri. N.T.Mundada Global View School

Mr. Lakshman L
Principal

Mrs. Chhaya O. Mundada
Chairperson

Admission Open 2026-27 Play Group & Nursery

## संपादकीय

# जीवनाचे अंतिम सत्य


मानवी जीवनाची धावपळ पाहिली तर एक गोष्ट स्पष्ट जाणवते, की आपण सर्वजण काहीतरी मिळविण्याच्या प्रयत्नात आयुष्य खर्च करीत असतो. शिक्षण, पदवी, पैसा, प्रतिष्ठा, मोठे घर, बँकेतील बचत या सर्व गोष्टी मिळविण्यासाठी आपण दिवस-रात्र झटत असतो. पण आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर या गोष्टींचे महत्त्व कसे बदलत जाते, याचा विचार आपण क्वचितच करतो. वयाच्या चाळिशीनंतर शिक्षण आणि पदवीचे आकर्षण हळूहळू कमी होऊ लागते. आयुष्याच्या वास्तवात अनुभव आणि परिस्थितीच अधिक महत्त्वाची ठरते. कधी साधा चहावाला देखील आपल्या कष्टाच्या बळावर आपल्यापेक्षा जास्त कमाई करताना दिसतो आणि तेव्हा 'डिग्री'पेक्षा 'जीवनकौशल्य' मोठे असते, याची जाणीव होते.

पन्नाशीनंतर सौंदर्याची मोहिनी ओसरते. चेहऱ्यावर काळाच्या खुणा उमटू लागतात. सजणे-संवरणे यापेक्षा आरोग्य आणि मानसिक समाधान अधिक महत्त्वाचे वाटू लागते. साठीनंतर पद आणि प्रतिष्ठेची चमकही फिकी पडते. कधी काळी आपल्या एका सहीने निर्णय बदलत असतील, पण निवृत्तीनंतर त्या अधिकाराची जागा शांततेने घेतलेली असते. समाजाचे वर्तुळही हळूहळू लहान होत जाते. सत्तरीनंतर घर मोठं की लहान, याला काहीच अर्थ राहत नाही. शरीराची साथ कमी होत जाते. दोन मजली घरापेक्षा छोटे, सोयीचे घर अधिक सुखद वाटते. ऐंशीच्या पुढे बँकेतली कोट्यवधींची रक्कमही औषधांच्या खर्चासमोर गौण ठरते. तेव्हा संपत्तीपेक्षा निरोगीपणा हा सर्वांत मोठा खजिना असल्याचे जाणवते.

या साऱ्या प्रवासात एक प्रश्न मनाला टोचत राहतो. हे सर्व धन जमवताना आपण किती आरोग्य गमावले? किती आनंद पुढे ढकलला? 'पैसे जमले की मग आनंद घेऊ' या विचारात वर्तमानकाळ हातातून निसटून जातो. शेवटी उरतो तो आजारांशी लढा आणि मागे वळून पाहताना उरलेली खंत. म्हणूनच जीवनाचा खरा अर्थ कदाचित संपत्तीच्या संचयात नसून समाधानाच्या शोधात आहे. देवाने दिलेल्या परिस्थितीत आनंद शोधणे, मनमोकळे जगणे आणि वर्तमान क्षणाचा स्वीकार करणे हीच खरी शहाणपणाची खूण आहे. मनासारखे जगणे आणि मनमोकळे जगणे यातील फरक समजला, की आयुष्याच्या वाटा आभाळाएवढ्या विस्तीर्ण होतात. जीवनाच्या शेवटच्या सत्याची जाणीव वेळेवर झाली, तर कदाचित आपण धावण्याचा वेग कमी करून जगण्याचा अर्थ अधिक खोलवर अनुभवू शकू.

# महर्षी दयानंद सरस्वती : वैदिक पुनरुत्थानाचे क्रांतिकारी पुरस्कर्ते

**जयंती विशेष**



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय समाजजीवनात सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणाऱ्या महर्षी दयानंद सरस्वती यांची जयंती देशभर श्रद्धा आणि प्रेरणादायी भावनेने साजरी केली जाते. अंधश्रद्धा, जातिभेद, मूर्तिपूजा आणि सामाजिक कुप्रथांविरुद्ध ठाम आवाज उठवून वैदिक धर्माचा पुनर्जागरण करणारे ते एक थोर समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि राष्ट्रप्रेरक होते. महर्षी दयानंद सरस्वती यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८२४ रोजी गुजरातमधील टंकारा येथे झाला. त्यांचे मूळ नाव 'मूळशंकर' असे होते. लहानपणापासूनच त्यांना धार्मिक वातावरण लाभले होते. मात्र बालवयातच त्यांनी मूर्तिपूजेबाबत प्रश्न उपस्थित केले. महाशिवरात्रीच्या दिवशी मंदिरातील मूर्तीसमोर उंदरांचे वावरणे पाहून त्यांच्या मनात संशय निर्माण झाला 'जी स्वतःचे रक्षण करू शकत नाही, ती आपले रक्षण कसे करेल?' या प्रश्नातूनच त्यांच्या विचारप्रक्रियेची दिशा ठरली. ज्ञानाच्या शोधासाठी त्यांनी घराचा त्याग केला आणि अनेक वर्षे देशभर भ्रमंती केली. अखेर स्वामी विरजानंद यांच्याकडून त्यांना वैदिक ज्ञानाची दीक्षा मिळाली. याच काळात त्यांनी वेदांच्या आधारे समाजपरिवर्तनाचा संकल्प केला.

### आर्य समाजाची स्थापना

१८७५ साली मुंबई येथे त्यांनी 'आर्य समाजा'ची स्थापना केली. 'वेदांकडे चला' हा त्यांचा मुख्य संदेश होता. वेद हेच सर्वोच्च ज्ञानाचे स्रोत असून, समाजातील सर्व अनिष्ट प्रथांचे उच्चाटन वैदिक तत्त्वांद्वारेच होऊ शकते, असा त्यांचा ठाम विश्वास होता. आर्य समाजाने स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निवारण, स्वदेशीचा पुरस्कार, आणि सामाजिक समता यांसारख्या विषयांवर मोठे कार्य केले. त्या काळात बालविवाह, सतीप्रथा, जातिभेद आणि अंधश्रद्धा यांचा समाजावर पगडा होता. या सर्वांविरुद्ध त्यांनी निर्भीडपणे आवाज उठवला.

### 'सत्यार्थ प्रकाश' : विचारांचा दीपस्तंभ

महर्षी दयानंद यांनी 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ लिहून आपल्या विचारांची मांडणी केली. या ग्रंथात त्यांनी वेदांचे महत्त्व स्पष्ट केले तसेच समाजातील रूढ प्रथांवर कठोर टीका केली. धार्मिक आडंबर, कर्मकांड आणि अंधश्रद्धा यांचा त्यांनी तर्कशुद्ध पद्धतीने प्रतिवाद केला. त्यांच्या लेखनातून विवेक, तर्क आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार दिसून येतो.

### राष्ट्रचेतनेचा जागर

महर्षी दयानंद हे केवळ धर्मसुधारक नव्हते, तर राष्ट्रप्रेमाची भावना जागवणारे विचारवंत होते. 'भारत भारतवासीयांसाठी' ही त्यांची भूमिका स्वातंत्र्यलढ्याच्या विचारधारेला प्रेरणा देणारी ठरली. त्यांच्या विचारांचा प्रभाव पुढे लोकमान्य टिळक, लाला लजपतराय आणि स्वामी श्रद्धानंद यांसारख्या नेत्यांवर पडला.

### शिक्षण आणि समाजसुधारणा

आर्य समाजाच्या माध्यमातून अनेक गुरुकुल, शैक्षणिक संस्था आणि समाजोपयोगी उपक्रम सुरू झाले. शिक्षण हेच समाजउद्धाराचे प्रमुख साधन आहे, असा त्यांचा विश्वास होता. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार देण्याचा त्यांनी पुरस्कार केला, जो त्या काळात क्रांतिकारी विचार होता.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झाली असली, तरी अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशा झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत महर्षी दयानंद यांचे विचार अधिकच समर्पक वाटतात. विवेकनिष्ठा, समानता, शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक जबाबदारी ही त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. महर्षी दयानंद सरस्वती यांचे जीवन हे सत्यशोधन, निर्भीडता आणि समाजसेवेचे प्रतीक आहे. त्यांनी दाखविलेला वैदिक मार्ग हा केवळ धार्मिक नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक उन्नतीचा मार्ग आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजातील अज्ञान, अन्याय आणि अंधश्रद्धा दूर करण्याचा संकल्प करणे, हीच त्यांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे आदरांजली ठरेल.

# तापीतून अवैध वाळू उपसा सुरूच!

## उदेवाल यांचे तहसीलदारांना निवेदन; कारवाई न झाल्यास आंदोलन छेडणार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : अमळनेरसह चोपडा तालुक्यातील तापी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरू आहे. यामध्ये अधिकृत ठेकेदारांकडूनच शासन नियमांचे उल्लंघन करीत अवैध पद्धतीने मोठ्या प्रमाणात हा प्रकार असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याबाबत अमळनेरमधील परेश रवींद्र उदेवाल या तरुणाने उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दिली असून, संबंधितांवर कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. तक्रारीत म्हटले आहे, की शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात वाळू उपसा केला जात असून, ठरलेल्या वेळेनंतर विशेषतः रात्री मोठ्या यंत्रसामुग्रीचा वापर करून उत्खनन व वाहतूक सुरू आहे.

अवजड वाहनांद्वारे होणाऱ्या या वाहतुकीमुळे नदीपात्राचेही मोठे नुकसान होत असून, पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. अवैध वाळू उपशामुळे परिसरातील शेती, भूजल पातळी, पूल व रस्ते धोक्यात आले आहेत. तसेच अमळनेर शहरातून मोठ्या प्रमाणात वेगाने धावणाऱ्या वाळूच्या वाहनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळकरी मुलांच्या मार्गावरूनही ही वाहतूक होत असल्याने पालकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. अवैध वाळू वाहतुकीच्या संबंधित वाहनांचे वजनही प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून तपासले जात नसून अधिकृत पावत्या दिल्या जात नसल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

महसूल व पर्यावरण विभागाच्या नियमांचे उघड उल्लंघन होत असल्याने प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे तक्रारदार उदेवाल यांनी नमूद केले आहे. सदर प्रकाराची तत्काळ चौकशी करून अवैध वाळू उपसा बंद करावा, तसेच संबंधित ठेकेदारांवर कडक कायदेशीर कारवाई व्हावी. यासाठी अधिकाऱ्यांनीही प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, याच मागणीचे निवेदन तहसीलदार श्री. रूपेशकुमार सुराणा यांनाही दिले आहे. संबंधितांकडून तत्परतेने कारवाई न झाल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही त्यात देण्यात आला आहे.

# रवींद्र मोरे यांना राज्यस्तरीय ज्ञानवंत पत्रकार पुरस्कार जाहीर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : 'सकल ज्ञान महोत्सव सन्मान व बक्षीस वितरण सोहळा २०२६' या प्रतिष्ठित कार्यक्रमात पत्रकार रवींद्र मोरे यांना राज्यस्तरीय ज्ञानवंत पत्रकार पुरस्कार जाहीर झाला आहे.

पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा मानाचा पुरस्कार त्यांना रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी जळगाव येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. जनमत प्रतिष्ठान व मुक्ताई महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे सकाळी नऊ वाजता हा सोहळा होणार आहे. 'डायट'चे माजी प्राचार्य निळकंठ गायकवाड प्रमुख वक्ते असतील. जळगावचे आमदार सुरेश भोळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. नवनिर्वाचित महापौर सौ. दीपमालाताई काळे आणि माजी महापौर सौ. जयश्रीताई महाजन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थितीही लाभणार आहे.

पत्रकार मोरे यांनी ग्रामीणबरोबरच शहरी भागातील प्रश्न, सामाजिक, राजकीय उपक्रम, तसेच जनसामान्यांच्या समस्या यावर सातत्याने लेखणी चालवून पत्रकारितेचे सामाजिक भान जपले आहे. सत्य, निष्पक्षता आणि जनहितासाठी झटणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल घेत आयोजक संस्थांनी त्यांना राज्यस्तरीय ज्ञानवंत पत्रकार पुरस्काराने गौरविण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, या पुरस्कारामुळे जळगाव जिल्ह्यातील पत्रकार व समाजातील विचारवंतांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आयोजक जनमत प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंकज नाले व मुक्ताई महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा सौ. निताताई मंगलसिंग सोनवणे यांनी मोरे यांच्या कार्याचे कौतुक करत 'हा सन्मान त्यांच्या माध्यमातून सत्यनिष्ठ पत्रकारितेला मिळणारा आदर आहे,' अशी भावना व्यक्त केली आहे.

# देवगाव खूनप्रकरणी आरोपीस दहा वर्षे सश्रम कारावास

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : चोपडा तालुक्यातील देवगाव येथे घडलेल्या खूनप्रकरणी आरोपीस जिल्हा न्यायालयाने दहा वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. चंद्रशेखर नामदेव सपकाळे (वय ३३, रा. पुनगाव, ता. चोपडा, ह. मु. देवगाव) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

अडावद पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर २०२१ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास देवगाव येथील प्लॉट भागात ही घटना घडली होती. फिर्यादी भावना रवींद्र पाटील यांच्या घरासमोर त्यांचे पती रवींद्र विश्राम पाटील हे मद्यप्राशन करून शिवीगाळ करीत होते. यावेळी आरोपी सपकाळे याने त्यास जाब विचारत वाद घातला. वाद वाढल्यानंतर आरोपीने रवींद्र पाटील यांना लाथाबक्क्यांनी मारहाण करून खाली पाडले व जवळील बैलगाडीचे शिंगाडे काढून पोटावर व पाठीवर जीवघेणी मारहाण केली. गंभीर जखमी झालेल्या रवींद्र पाटील यांना १६ ऑक्टोबर २०२१ रोजी जळगाव येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

यासंदर्भात जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती सी. व्ही. पाटील यांच्या न्यायालयात खटला चालला. सरकारी पक्षातर्फे अॅड. के. आर. बागूल मंगरूळकर यांनी एकूण नऊ साक्षीदार तपासले. त्यात मृताची पत्नी, वडील व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष महत्त्वाची ठरली. तसेच डॉ. निलेश देवराज यांच्याकडून प्राप्त शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. पुराव्यांअंती न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत दहा वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली. या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक उदयसिंग सांळुके, हवालदार पुरुषोत्तम वाल्डे, पोलीस शिपाई सतीश भोई, राहुल रणधीर, प्रमोद पाटील व भरत ईशी यांनी तपासकार्यात सहकार्य केले.

# दहिवदला घरफोड्या, दुचाकी चोरी; ६८ हजारांचा मुद्देमाल लंपास

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील दहिवद येथे मंगळवार-बुधवार दरम्यान रात्री घरफोड्या व दुचाकी चोरीच्या घटनांनी ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घरे फोडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम तसेच घरासमोरील मोटारसायकल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत कल्पेश मोकुळ माळी (वय ३२, रा. दहिवद ता. अमळनेर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या मावशी भिकूबाई सुकलाल माळी या न्यू प्लॉट भागात एकट्या राहतात. त्या ६ फेब्रुवारी रोजी किनगाव (ता. यावल) येथे नातेवाईकांकडे गेल्या होत्या. दरम्यान ११ फेब्रुवारी रोजी सकाळी त्यांच्या घराचे कुलूप तुटलेले व दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले. तसेच घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले असून, गोदरेज कपाट फोडून त्यातील दागिने चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. चोरीस गेलेल्या ऐवजात अंदाजे १० ग्रॅम सोन्याचे दागिने, सुमारे २४ भार चांदीचे दागिने असा एकूण सुमारे ५४ हजारांचा मुद्देमाल आहे. याचवेळी गावातील प्रतिभा जयवंत भदाणे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून सुमारे चार हजार रुपये रोख रक्कम चोरून नेण्यात आले. तसेच महेंद्र भिका माळी यांच्या घरासमोर उभी असलेली हिरो होंडा स्प्लेंडर (क्र. एमएच-१९ एल ०८६३) ही सुमारे दहा हजार रुपये किमतीची दुचाकीही अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. यासंदर्भात अज्ञात चोरट्यांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# चांदणी कुऱ्हे खुर्द येथे मोटारींची चोरी

## अज्ञात चोरट्यांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा


अमळनेर : तालुक्यातील चांदणी कुऱ्हे खुर्द येथे शेतातील विहिरींवरून सोलर पंप मोटारी चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत नवल उखा धनगर (वय ६०, रा. चांदणी कुऱ्हे खुर्द, ता. अमळनेर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले, की श्री. धनगर यांच्या गट क्रमांक २२ मधील शेतात सहा महिन्यांपूर्वी खरेदी करून बसविलेली जेके कंपनीची ५ एच.पी. सोलर पंप मोटार चोरट्यांनी चोरून नेली. सोमवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत शेतात पाणी दिल्यानंतर ते घरी गेले. मात्र दुसऱ्या दिवशी (दि. १० फेब्रुवारी) सकाळी शेतात गेले असता मोटारीला जोडलेला पाईप कापलेला दिसला व मोटार चोरून नेल्याचे आढळून आले.

दरम्यान, शेजारील शेतकरी सुरेश राजाराम पाटील (रा. चांदणी कुऱ्हे बुद्रुक) यांच्या गट क्रमांक १८ मधील शेतात क्रॉम्प्टन कंपनीची ३ एच. पी. सोलर मोटार व व्हायगल कंपनीची ३ एच. पी. जलपरी मोटार देखील चोरीस गेल्याचे समोर आले. चोरीस गेलेल्या मोटारींची एकूण किंमत सुमारे ३० हजार रुपये असून, दि. ९ फेब्रुवारी सायंकाळी ६ ते दि. १० फेब्रुवारी सकाळी आठ वाजेदरम्यान चोरट्यांनी त्या नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. यासंदर्भात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी फिर्यादीने केली असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# सोन्याच्या दरात घट; चांदी स्थिर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चढ-उतार सुरू असतानाही सोने आणि चांदीच्या दराचा दबदबा कायम होता. मात्र मंगळवारनंतर सलग दुसऱ्या दिवशी बुधवारी सोन्याच्या दरात घट, तर चांदीचे दर स्थिर राहिले. त्यामुळे बाजारपेठेतील उलाढालीवरही त्याचा सकारात्मक परिणाम झाल्याचे पाहावयास मिळाले.

### सोन्याच्या दराची काय स्थिती?

जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत मंगळवारी दिवसभरात ५१५ रुपयांची किरकोळ वाढ नोंदविली गेल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर ३ टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ६१ हजार ७१० रुपयांपर्यंत पोहोचले होते. बुधवारी सकाळी बाजार उघडल्यावर २०६ रुपयांची किरकोळ घट झाली. त्यामुळे सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ६१ हजार ५०४ रुपयांपर्यंत खाली आले.

### चांदीच्या दराची काय स्थिती?

जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत मंगळवारी बाजार बंद होईपर्यंत चांदीत कोणतीही वाढ अथवा घट नोंदविली गेली नाही. त्यामुळे चांदीचे दर ३ टक्के जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ७५ हजार ०१० रुपयांवर स्थिरावले. दुसऱ्या दिवशी बुधवारी सकाळी बाजार उघडल्यावरही कोणतीही वाढ अथवा घट नोंदविली गेली नाही. त्यामुळे चांदीचे दर जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ७५ हजार रुपयांवर स्थिर राहिले.

# अमळनेरसह परिसरात पारा ३२ अंशांवर

## येत्या आठवड्यात तापमान वाढण्याची शक्यता

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : जिल्ह्यात बुधवार, दि. ११ फेब्रुवार रोजी तापमानाचा पारा ३२ अंशांवर गेला आहे. येते काही दिवस हवामान स्वच्छ आणि कोरडे राहणार आहे. त्यामुळे उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. गेल्या पाच दिवसांपासून सकाळचा आल्हाददायक गारवा आणि दुसरीकडे दुपारची तीव्र उष्णता असा संमिश्र अनुभव येत होता.

बुधवारी कमाल तापमान ३२.३ तर किमान १२८ अंश सेल्सिअसवर होते.

### काय म्हणतात तज्ज्ञ?

येत्या पाच दिवसांत किमान आणि कमाल तापमानात मोठी तफावत जाणवेल. दुपारी कमाल तापमान ३१ ते ३५ अंश राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे काहीसा उकाडा जाणवेल. सकाळी व रात्री किमान तापमान १४ ते १६ अंश राहील. यामुळे पहाटे आणि रात्री हलका गारवा कायम असेल. हवामान कोरडे राहणार असल्याने जमिनीतील ओलावा लवकर शोषला जाण्याची शक्यता आहे. आकाश निरभ्र असल्याने धुके कमी होईल आणि दृश्यमानता चांगली राहील, असे हवामान अभ्यासकांनी सांगितले.

# रशियाच्या वैद्यकीय विद्यापीठातील चाकूहल्ल्यात चार भारतीय विद्यार्थी जखमी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रशियाच्या बाशकोर्तीस्तान प्रजासत्ताकातील एका विद्यापीठातील परदेशी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी चाकूहल्ला झाला. या चाकूहल्ल्यात चार भारतीय विद्यार्थ्यांसह अनेक जण जखमी झाले, अशी माहिती मॉस्कोमधील भारतीय दूतावासाने दिली.

स्थानिक माध्यमांच्या प्राथमिक वृत्तानुसार हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करताना दोन पोलीस अधिकारीही जखमी झाले. बाशकोर्तीस्तानची राजधानी उफा येथील स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटीच्या वसतिगृहात हा हल्ला झाला. रशियाच्या गृह मंत्रालयाने सांगितले, की प्राथमिक माहितीनुसार चाकू घेऊन सज्ज असलेल्या एका १५ वर्षीय मुलाने वैद्यकीय विद्यापीठाच्या वसतिगृहात प्रवेश केला आणि तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर हल्ला केला. ज्यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले.

### आरोपीने स्वतःलाही शारीरिक इजा केली

'हल्लेखोराने अटकेचा प्रतिकार केला. त्यादरम्यान दोन पोलीस अधिकाऱ्यांना चाकूने वार करण्यात आले. शिवाय, संशयिताने स्वतःलाही शारीरिक इजा केली', असे गृह मंत्रालयाच्या प्रवया मेजर जनरल इरिना वोल्क यांनी सांगितले. संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. पीडितांना आणि हल्लेखोराला किती दुखापत झाली आहे हे कळू शकले नाही. तपास समितीने घटनेची चौकशी सुरू केली आहे. घटनेनंतरचे दृश्य दाखवणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे, त्यात पोलीस अधिकारी आरोपीला बर्फाच्या जाड थरांमधून बाहेर काढताना दिसत आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ना कोचिंग, ना रिजर्वेशन, ना बहाना...

## शरीर का ये अंग काम नहीं करता था, फिर भी बनीं आयएएस, ४ महीनों...

**सक्सेस स्टोरी**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कई बार जिंदगी ऐसे-ऐसे इम्तिहान लेती है कि इंसान अंदर से टूट जाता है। लेकिन कुछ लोग लहरों के खिलाफ तैरकर अपनी मंजिल को पा लेते हैं और अपनी मुश्किलों को ही अपनी ताकत बना लेते हैं। आयएएस सौम्या शर्मा की कहानी ठीक ऐसी ही है। जिनके साथ १६ साल की उम्र में एक हादसा हुआ, जिसने उनकी जिंदगी को पूरी तरह से बदल दिया, लेकिन इसके बावजूद उन्होंने हार नहीं मानी।

सौम्या शर्मा जब सिर्फ १६ साल की थीं, तभी उन्हें इस बात का एहसास होने लगा कि उनकी सुनने की क्षमता धीरे-धीरे कम हो रही है। यह किसी भी इंसान के लिए एक बेहद कठिन दौर हो सकता है। उनके माता-पिता, जो पेशे से डॉक्टर हैं, उन्होंने इलाज में कोई कसर नहीं छोड़ी, लेकिन वो कभी पूरी तरह से ठीक नहीं हो पाईं।

हालांकि, इन मुसीबतों के बावजूद सौम्या ने खुद को कमजोर समझने के बजाय, मानसिक रूप से और ज्यादा मजबूत बनने का फैसला किया और वो कर दिखाया जिसके बारे में कोई सोच भी नहीं सकता था। मकसद था देश की सेवा करना सौम्या शर्मा दिल्ली की रहने वाली हैं और शुरू से ही पढ़ाई में काफी अच्छी रही हैं। स्कूल खत्म करने के बाद उन्होंने नेशनल लॉ स्कूल में एडमिशन लेकर पांच साल इंटीग्रेटेड लॉ का कोर्स किया। यहीं से उनके मन में यह सोच पनपी कि वह प्रशासनिक सेवा में जाकर समाज के लिए कुछ करना चाहती हैं।

बिना कोचिंग यूपीएससी की तैयारी जहां ज्यादातर उम्मीदवार यूपीएससी की तैयारी में सालों लगा देते हैं, वहीं सौम्या शर्मा ने सिर्फ चार महीने की सेल्फ स्टडी के दम पर सिविल सर्विस का प्रिलिम्स पास कर लिया। उन्होंने किसी कोचिंग इंस्टीट्यूशन का सहारा नहीं लिया और पूरी तरह खुद की प्लानिंग पर भरोसा किया। यहां तक कि मेन एग्जाम के दौरान उनकी तबीयत इतनी खराब थी कि उन्हें बार-बार अस्पताल जाना पड़ा, लेकिन फिर भी उन्होंने परीक्षा नहीं छोड़ी। पहली कोशिश में हासिल की ऑल इंडिया रैंक ९ साल २०१७ की यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में सौम्या शर्मा ने ऑल इंडिया रैंक ९ हासिल कर सबको चौंका दिया। खास बात यह रही कि उन्होंने दिव्यांग कोटे का भी फायदा नहीं लिया और जनरल कैटेगरी से यह मुकाम हासिल किया। उनकी यह सफलता साबित करती है कि असली जीत आत्मविश्वास और लगातार मेहनत से मिलती है। 'सेल्फ स्टडी है सबसे बड़ी कुंजी' आयएएस सौम्या शर्मा के मुताबिक, अगर किसी स्टूडेंट को खुद पर भरोसा है, तो कोचिंग जरूरी नहीं होती। सही गाइडेंस, अनुशासन और रेगुलर पढ़ाई से लक्ष्य तक पहुंचा जा सकता है। वह यह भी मानती हैं कि कोचिंग लेने के बावजूद, सेल्फ स्टडी की कोई जगह नहीं ले सकता। आज कहां हैं आयएएस सौम्या शर्मा? आयएएस सौम्या शर्मा २०१८ बैच की अधिकारी हैं और फिलहाल महाराष्ट्र कैडर में अपनी सेवाएं दे रही हैं। वह नागपुर जिला परिषद की सीईओ के रूप में भी काम कर चुकी हैं। सोशल मीडिया पर भी वह काफी सक्रिय हैं और हजारों युवाओं को अपनी यात्रा से प्रेरित करती हैं।

आयएएस सौम्या शर्मा की पर्सनल लाइफ आयएएस सौम्या शर्मा ने आयपीएस अधिकारी अर्चित चांडक से शादी की है, जो आयआयटी दिल्ली से इंजीनियरिंग कर चुके हैं। दोनों ही महाराष्ट्र कैडर में कार्यरत हैं और सोशल मीडिया पर उनकी जोड़ी को लोग काफी पसंद करते हैं।

यह कहानी उन सभी युवाओं के लिए प्रेरणा है, जो खुद पर शक करते हैं। सौम्या शर्मा यह साबित करती हैं कि अगर इरादे मजबूत हों, तो कोई भी चुनौती रास्ता नहीं रोक सकती।



# पाणी बाटलीच्या किमतीचे रहस्य!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

ॲमेझॉनवर एक लिटर पाण्याची बाटली १८ रुपयांना आहे.
सुपरमार्केटमध्ये याच बाटलीची किंमत सुमारे २० रुपये आहे.
एका बारमध्ये याच बाटलीची किंमत ५० रुपये आहे.
चांगल्या रेस्टॉरंट किंवा हॉटेलमध्ये या बाटलीची किंमत १०० रुपयांपर्यंत असते.
विमानतळावर आपल्याकडून १००/१५० रुपये आकारले जातात.
बाटली आणि ब्रँड एकच आहे. फक्त जागा बदलते. प्रत्येक ठिकाण एकाच उत्पादनाला वेगळे मूल्य देते.
जेव्हा असे वाटते, की आपली काहीच किंमत नाही आणि प्रत्येकजण आपल्याला खाली आणतो तेव्हा तेथे राहू नका, उठून नवीन जागा शोधा.
ठिकाणे बदलण्याचे धाडस ठेवा आणि अशा ठिकाणी जा जेथे आपल्याला आपल्या लायकीचे मूल्य दिले जाईल.
स्वतःला अशा लोकांसह वेढून घ्या, जे आपल्या योग्यतेची खरोखर प्रशंसा करतात.
कमीसाठी सेटलमेंट करू नका.



# मेल्यानंतरही सापात विष असते का? तो दंश करू शकतो का?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जगभरात दरवर्षी विषारी सापांच्या दंशाने लाखो लोकांचा जीव जातो. याच कारणाने अनेक एक्सपर्ट लोकांना सापांपासून दूर राहण्याचा सल्ला देतात. कारण सापाने दंश मारणे ही एक मेडिकल इमरजन्सी आहे आणि वेळीच जर उपचार मिळाला नाही तर व्यक्तीचा जीव जाऊ शकतो. काही साप विषारी असतात, हे सगळ्यांनाच माहीत आहे. पण काही लोकांना असे वाटते, की सापांच्या हाडांमध्ये सुद्धा विष असते. अशात जर चुकून त्यावर पाय दिला तर आपला जीव जाऊ शकतो, असा समज आहे. यात किती तथ्य आहे हे आज आपण समजून घेणार आहोत.



**खरोखर सापांच्या हाडांमध्ये विष असते?**

ज्या लोकांना वाटते, की सापांच्या हाडांमध्येही विष असते. ते चुकीचा विचार करत आहेत. मुळात सापांचे विष हे विष ग्रंथींमध्ये असते जी त्याच्या तोंडात आणि डोळ्यांच्या मागे असते. जेव्हा साप एखाद्या व्यक्तीला किंवा प्राण्याला दंश करतो तेव्हा त्याचे समोरचे दात व्यक्तीमध्ये हळूहळू विष सोडत असतात.

**मेल्यानंतरही सापात विष असते का?**

हो हे खरे आहे. एक मेलेला साप किंवा मुंडके छाटलेला साप मेल्यानंतरही अनेक तासांनंतर विष सोडू शकतो. मेल्यानंतर साप दंश करू शकतो. कारण त्याच्या विषग्रंथींमध्ये काही प्रमाणात विष शिल्लक असते. अशात जर कुणी मेलेल्या सापावर पाय ठेवत असेल किंवा त्याच्या त्वचेच्या संपर्कात येत असेल तर शक्यता आहे, की व्यक्तीच्या शरीरात विष प्रवेश करू शकते. अशात सल्ला दिला जातो, की जर कुठे मेलेला साप दिसला तर त्याच्यापासून दूरच राहावे.

**मेलेला साप दंश करु शकतो का?**

एक मेलेला सापही दंश करू शकतो आणि विष पसरवू शकतो. काही संशोधनानुसार मेल्यानंतरही सापाच्या शरीरात रिफ्लेक्सेस अनेक तासांपर्यंत काम करत असतात. ज्यामुळे तो उत्तेजित झाल्यावर दंश करू शकतो. आसाममध्ये करण्यात आलेल्या संशोधनानुसार कोब्रा आणि करेतसारखे विषारी मेल्यानंतर तासांनीही दंश केल्याच्या घटना समोर आल्या आहेत.


**सापाने दंश केल्यावर कसे वाटते?**

जर एखाद्या व्यक्तीला सापाने दंश केला, ते जोरात वेदना होतात. वेदना वाढतच जातात. तसेच जखमेवर सूज येते आणि तो भाग निळा होतो. व्यक्तीला चक्कर येते, मळमळ होते आणि अस्वस्थता जाणवते. सोबतच दुसरे दिसते आणि श्वास घेण्यास त्रास होतो.

# 'आम्ही एकमेकांना...', जया बच्चन यांच्यासमोर अमिताभ बच्चन यांना रेखाबद्दल विचारण्यात आले अन्...

## रेखाबरोबरच्या नात्याबद्दल काय म्हणाले होते अमिताभ बच्चन?





ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमिताभ बच्चन आणि रेखा यांची प्रेमकहाणी बॉलिवूडमधील सर्वाधिक चर्चेत राहिली. या नात्याबद्दल अनेक दशकांपासून चर्चा होत असल्या तरी, खुद्द अमिताभ बच्चन यांनी मात्र यावर कधीही उघडपणे भाष्य केलेले नाही. अमिताभ आणि रेखा यांच्यातील जवळीक १९७६ मध्ये 'दो अंजाने' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान वाढली होती. त्यावेळी अमिताभ बच्चन यांचे जया भादुरी यांच्याशी लग्न होऊन तीन वर्षे झाली होती. सुरुवातीला या नात्याबद्दल कुणालाही कल्पना नव्हती. १९७८ मध्ये 'गंगा की सौगंध' चित्रपटाच्या शूटिंगवेळी एक घटना घडली. एका सह-कलाकाराने रेखा यांच्याशी गैरवर्तन केले, तेव्हा अमिताभ बच्चन यांनी प्रचंड संताप व्यक्त केला होता. या घटनेनंतर प्रसारमाध्यमांमध्ये त्यांच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आले.

दिग्दर्शक यश चोप्रा यांचा 'सिलसिला' (१९८१) हा चित्रपट या नात्याचा टर्निंग पॉईंट मानला जातो. या चित्रपटात अमिताभ, जया आणि रेखा हे तिघेही एकत्र होते. चित्रपटाची कथा देखील एका विवाहित पुरुषाच्या विवाहबाह्य संबंधावर आधारित होती. या चित्रपटानंतर या जोडीने पुन्हा कधीही एकत्र काम केले नाही. एकेकाळी एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेले हे दोघे ब्रेकअपनंतर कधीच एकत्र काम करताना दिसले नाहीत. रेखा व अमिताभ बच्चन बरेचदा एकाच कार्यक्रमाला हजेरी लावतात, पण अंतर ठेवून असतात. रेखा अमिताभ बच्चन यांच्यावरचं प्रेम व्यक्त करत असतात. तसेच त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना त्या भेटतात. जया बच्चन, अभिषेक बच्चन, ऐश्वर्या राय व आराध्या यांना रेखा भेटून त्यांची प्रेमाने विचारपूस करतात.

**रेखाबद्दल अमिताभ बच्चन म्हणालेले...**

रेखा यांनी बिग बींवर प्रेम असल्याचे अनेकदा बोलून दाखविले. पण अमिताभ बच्चन मात्र कधीच रेखाबद्दल बोलायचे नाहीत. एकदा मुलाखतीत सिमी गरेवालने बिग बींना रेखाविषयी विचारले होते. रेखाबरोबरच्या नात्याबद्दल विचारले असता, 'ती माझी सहकलाकार आणि सहकारी आहे. आणि जेव्हा आम्ही एकत्र काम करत होतो, तेव्हा साहजिकच आम्ही एकमेकांना भेटलो होतो. आमच्यात काहीच साम्य नाही. काहीवेळा आपण एखाद्या कार्यक्रमात, म्हणजे एखाद्या पुरस्कार सोहळ्यात वगैरे भेटतो तेवढेच,' असे अमिताभ बच्चन सिमी गरेवालला म्हणाले होते.

असे म्हटले जाते की, जया बच्चन यांनी एकदा रेखा यांना रात्री जेवायला बोलावलं होते आणि स्पष्ट सांगितलं होते की त्या अमितजींना कधीही सोडणार नाहीत. त्यामुळे रेखाने त्यांच्या आयुष्यातून निघून जावं. त्यानंतर रेखा अमिताभ बच्चन यांच्यापासून दूर गेल्या, अशीही चर्चा होते. दरम्यान, अमिताभ आणि रेखा यांची जोडी आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे, पण त्यांच्या खासगी आयुष्यातील हे प्रकरण आजही एक अधुरी कहाणी म्हणूनच ओळखले जाते.

# सिग्नलशिवाय धावणारी भारतातील एकमेव ट्रेन

## सव्वाशे वर्षांपासून हात दाखवताच थांबते

ग्लोबल महातेज वृत्तसेवा


भारतात रेल्वेचे मोठे नेटवर्क आहे. दररोज लाखो लोक ट्रेनने प्रवास करतात. मात्र, भारतात एक अशी ट्रेन आहे, जी गेल्या १२४ वर्षांपासून विना सिग्नलशिवाय धावते. याबाबत माहिती जाणून घेऊयात.

**ट्रेनचे नाव आणि स्थान :** ही अनोखी ट्रेन उत्तर प्रदेशातील बुंदेलखंड भागात जालौन जिल्ह्यातील 'एट जंक्शन' ते 'कोंच' दरम्यान धावते. स्थानिक लोक या ट्रेनला प्रेमाने 'अद्दा' म्हणून ओळखतात.

**विना सिग्नल प्रवास :** देशातील इतर सर्व गाड्या सिग्नलच्या आधारावर चालतात. मात्र, ही ट्रेन गेल्या १२४ वर्षांपासून कोणत्याही सिग्नलशिवाय धावत आहे.

**हाथ दाखवल्यावर थांबते :** या ट्रेनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रवाशांनी हात दाखवताच ती थांबते. प्रवाशांना ट्रेन पकडण्यासाठी प्लॅटफॉर्मवर उभे राहून फक्त हात दाखवण्याची गरज असते.

**कमी वेग आणि अंतर :** ही एक शटल ट्रेन असून तिचा मार्ग केवळ १३ किलोमीटर लांब आहे. ट्रेनचा वेग ताशी ३० किमी असून हे अंतर पार करण्यासाठी तिला साधारण ४० मिनिटे लागतात.



**ऐतिहासिक वारसा :** या ट्रेनची सुरुवात ब्रिटिशांनी १९०२ मध्ये केली होती. आजही ती त्याच जुन्या परंपरेने आणि वैशिष्ट्यांसह सुरू आहे. या ट्रेनला फक्त ३ डबे आहेत. हा मार्ग येथील शेतकरी आणि छोट्या व्यापाऱ्यांसाठी खूप महत्त्वाचा आहे.

# सचिन तेंडुलकरची होणारी सून सानिया चंढोक आहे तरी कोण?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मुलगा अर्जुन तेंडुलकरच्या लग्नाचे आमंत्रण दिले. अर्जुन तेंडुलकर उद्योगपती रवी घई यांची नात सानिया चंढोकशी लग्न करणार आहे. सचिनने राहुल गांधींनाही भेटले आणि त्यांना लग्नाची पत्रिका दिली. जाणून घ्या कोण आहे अर्जुनची होणारी पत्नी सानिया चंढोक?



**सानिया चंढोक कोण आहे?**

सानिया चंढोक ही एक भारतीय उद्योजिका आणि पशुवैद्यकीय तंत्रज्ञ आहे. महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याच्याशी साखरपुडा झाल्यामुळे ती अलीकडेच चर्चेत आली आहे. मुंबईची रहिवासी असलेली सानिया एका प्रसिद्ध व्यावसायिक कुटुंबातील आहे. परंतु प्राणी कल्याणाची आवड जोपासत तिने उद्योजिका म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**सानिया चंढोकचे शिक्षण**

सानिया तिचे शालेय शिक्षण मुंबईतील बी.डी. सोमाणी इंटरनॅशनल स्कूल आणि द कॅथेड्रल ॲण्ड कॉनन स्कूल यांसारख्या नामांकित शाळांमधून पूर्ण केले. त्यानंतर तिने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्समधून २०२० मध्ये बिझनेस मॅनेजमेंटची पदवी मिळविली. व्यवसाय शिक्षणासोबतच सानियाने २०२४ मध्ये वर्ल्डवाइड व्हेटर्नरी सर्व्हिसच्या एबीसी प्रोग्राममधून पशुवैद्यकीय तंत्रज्ञ म्हणून प्रमाणपत्र मिळविले. याद्वारे तिने व्यावसायिक ज्ञानाची सांगड प्रत्यक्ष प्राणी सेवेशी घातली आहे.

**करिअर आणि स्वतःचा व्यवसाय**

प्राण्यांविषयी असलेल्या ओढीमुळे सानियाने २०२२ मध्ये मिस्टर पॉज पेस्ट स्पा ॲण्ड स्टोअर एलएलपीची सुरूवात केली. ही मुंबईतील एक लक्झरी पेट ग्रूमिंग आणि केअर ब्रँड आहे. ती या कंपनीची डेझिग्नेटेड पार्टनर आणि संचालक असून, पाळीव प्राण्यांसाठी उच्च दर्जाचे ग्रूमिंग, स्किनकेअर आणि वेलनेस सेवा पुरविण्यावर तिचे लक्ष आहे. तिचा हा व्यवसाय तिच्यातील उद्योजकता आणि प्राण्यांवरील प्रेम यांचे उत्तम मिश्रण आहे. भारतातील वेगाने वाढणाऱ्या पेट केअर उद्योगात तिने स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.

**कौटुंबिक वारसा**

सानिया ही मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपती रवी घई यांच्या कुटुंबातील आहे. रवी घई हे ग्रॅव्हिस ग्रुपचे संस्थापक आहेत. ज्यांचे आदरातिथ्य आणि अन्न उद्योगात मोठे नाव आहे. क्वालिटी आईस्क्रीम, ब्रुकलिन क्रीमरी आणि मरीन ड्राइव्हवरील इंटरकॉन्टिनेंटल हॉटेल हे याच समूहाचे भाग आहेत. तिचे कुटुंब एका मोठ्या व्यावसायिक साम्राज्याचे मालक असले, तर सानियाने पेट केअर आणि प्राणी कल्याण क्षेत्रात आपले स्वतंत्र करिअर घडवले आहे.

१३ ऑगस्ट २०२५ रोजी सानिया चंढोकचा साखरपुडा क्रिकेटपटू आणि सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याच्याशी झाला. हा सोहळा अत्यंत खासगी स्वरूपात जवळचे मित्र आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत पडला होता.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# भक्तीबरोबरच पुरूषार्थ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

समर्थ श्री रामदास स्वामी यांचे बालपणीचे नाव नारायण. वडील सूर्याजीपंत ठोसर आणि आईचे नाव राणूबाई. जन्म चैत्र शुक्ल नवमी (म्हणजे श्रीरामनवमीचा दिवस) या दिवसी सन १६०८ मध्ये मराठवाड्यातील जांब गावी झाला. नारायण यांना सुंदर रूप, सुदृढ देहयष्टी, तेजस्वी बुद्धी आणि चपळ वृत्ती लाभली होती. घरात अनेक पिढ्यांपासून प्रभू श्रीरामचंद्रांची व सूर्यनारायणांची उपासना चालू होती. वडील सूर्याजीपंत यांच्याकडे कुलकर्णीपद होते पण यवनांच्या जाचक दबावामुळे त्यांनी ते सोडून दिले होते. आणि येथूनच परक्यांच्या जाचाचा नारायण यांना परिचय झाला. सभोवतालची अत्याचारग्रस्त समाजस्थिती पाहून स्वकीय समाजाचे परित्राण करायचा ठाम निश्चय झाला आणि याचकरिता बाराव्या वर्षी लग्नमंडपातून पळून जाऊन पुढील कार्याची तयारी सुरू झाली. नाशिकजवळ गोदावरीकाठी टाकळी परिसरात सूर्यनमस्कार, नदीपात्रात उभे राहून जपसाधना, गायत्री व त्रयोदशाक्षरी प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंत्राची पुरश्चरणे इत्यादी अशी बारा वर्षे तपश्चर्या केली. या काळात शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आत्मिक विकास साधून पुढील कार्याची पायाभरणी झाली. यापुढील बारा वर्षे तीर्थयात्रा करीत समाजजीवनाचे बारकाईने निरीक्षण करीत भावी कार्याची दिशा निश्चित केली. प्रभू श्रीरामचंद्रांच्या सेवेची सिद्धता झाली आणि नारायण आता 'रामदास' बनले.

गावोगावी श्रीराम मंदिरे, हनुमान मंदिरे स्थापन करीत सुमारे ११०० मठांची स्थापना केली. या सर्व ठिकाणी भक्तिभावाच्या संस्कारासह पुरुषार्थ प्रेरणा, बलोपासनेला तेवढेच महत्त्व व प्राधान्य देण्याची व्यवस्था केली. समाजाचे मानसिक परिवर्तन घडवून प्रतिकाराची, विजयाची आकांक्षा जागृत करण्याचे कार्य समर्थांनी केले आणि त्यामुळे स्वराज्याची आशा निर्माण झाली. योगायोगाने याच काळी छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य संस्थापनेच्या कार्यात गढलेले होते. दोघांचे कार्यक्षेत्र वेगळे असले तरी एकाच ध्येयासाठी आणि एकाच दिशेने असल्यामुळे परस्परपूरक होते. ब्रह्मतेजाची आणि क्षात्रतेजाची युती घडून आली. निखळ परमार्थाबरोबरच काळानुसार समाजाच्या हितासाठी व्यावहारिक उपदेशाची आवश्यकता होती आणि हेच समर्थांचे भूषण होते. **'स्वये सदा नम्र वाचे वदावे। मना सर्व लोकासि रे नीववावे ॥'** अशी नम्रता अंगी बाणवावयास हवी हे सांगत असता नम्रता म्हणजे कमजोरपणा नव्हे हेही समाजात रुजवावे लागते हे समर्थ जाणून होते. म्हणून नम्रता अंगी बाणवत असता एखाद्या अधमाशी वा उद्धटाशी गाढ पडल्यास त्या ठिकाणी **'धटासि आणावा धट। उद्धटासि उद्धट। खटनटासि खटनट। अगत्य करी ॥'** एवढे सांगून न थांबता **'हुब्यास हुब्या लावून द्यावा। टोणप्यास टोणपा आणावा। लौंदापुढे उभा करावा। दुसरा लौंद ॥'** ही शिकवण केवळ समर्थांनीच द्यावी. समर्थांच्या वाङ्मयात भक्तीबरोबर पुरुषार्थ आणि प्रयत्नवाद याला तेवढेच महत्त्व दिलेले आढळते. 'शेवटी परमेश्वराने आपल्यासाठी काय ठरविले आहे तेवढेच आपल्या वाट्यास येणार ना ?' असे म्हणणे अयथार्थ जरी नसले तरी समर्थांचे त्यांस सांगणे असे, की – **'आधीं कष्ट मग फळ। कष्टचि नाही तें निष्फळ'** – आपण कष्ट केल्यावाचून परमेश्वर आपणास जे पाहिजे आहे ते देणार नाही. कार्यसिद्धीसाठी आपले कष्ट (प्रयत्न) आणि परमेश्वर कृपा या दोन्हींची आवश्यकता आहे.

# दासनवमी : विवेकाचा, परमार्थाचा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दासनवमी (किंवा श्री रामदास नवमी) हा श्री रामदास स्वामी यांचा समाधी दिन आहे. ही तिथी माघ कृष्ण नवमी रोजी येते. या दिवशी समर्थांच्या सज्जनगडावरील समाधीची विशेष पूजा केली जाते आणि विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस श्री रामदास स्वामी यांची पुण्यतिथी म्हणूनही साजरा होतो.

## दासनवमीची मुख्य माहिती

समर्थ श्री रामदास स्वामी हे स्वतःला प्रभू श्रीरामचंद्रांचा 'दास' (सेवक) मानत. त्यामुळे त्यांच्या स्मृतीला 'दासनवमी' म्हणतात. समर्थांनी माघ वद्य नवमी (शके १६०८, सन १६८१) रोजी सज्जनगडावर समाधी घेतली. साताराजवळील सज्जनगड हे दासनवमीचे मुख्य केंद्र आहे जेथे हजारो भाविक दर्शनासाठी येतात. या दिवशी पहाटे काकड आरती, मंत्रपुष्पांजली, समाधीची पूजा आणि समर्थांच्या दासबोध ग्रंथाचे पारायण व कीर्तन होते.

समर्थ रामदास स्वामींनी समाजप्रबोधन, दासबोध ग्रंथनिर्मिती, मनाचे श्लोक आणि ११ मारुतींची स्थापना करून लोकशिक्षण व धर्मसंस्थापनेचे मोठे कार्य केले.

## दासनवमी म्हणजे काय?


दासनवमी म्हणजे समर्थ रामदास स्वामींचा पुण्यतिथीचा दिवस. ज्या दिवशी त्यांनी आपला देह ठेवला आणि अनंतात विलीन झाले, त्या तिथीला 'दासनवमी' म्हणतात. हा दिवस केवळ एका संतांची पुण्यतिथी नाही, तर तो 'विवेकाचा उत्सव' आहे. समर्थांनी समाजाला शिकवले की संसारातील जबाबदाऱ्या टाळून परमार्थ करू नका, तर संसारात राहूनच ईश्वराची भक्ती करा. तसेच कठीण काळातही आपला निश्चय ढळू देऊ नका.

## मनाचे श्लोक एकूण किती आहेत?

समर्थ श्री रामदास स्वामींनी रचलेले 'मनाचे श्लोक' हे अत्यंत लोकप्रिय आणि मनावर संस्कार करणारे आहेत. मनाचे श्लोक एकूण २०५ आहेत. या श्लोकांविषयीची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. हे सर्व श्लोक 'भुजंगप्रयात' वृत्तात रचलेले आहेत. यामुळे त्यांना एक विशिष्ट लय प्राप्त झाली असून ते पाठ करायला अत्यंत सोपे आहेत. मनाच्या श्लोकांची सुरूवात 'गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा' या गणपतीच्या स्तवनाने होते.

## संत श्री रामदास स्वामी यांच्याबद्दल माहिती

समर्थ श्री रामदास स्वामी हे महाराष्ट्रातील संत परंपरेतील एक अत्यंत तेजस्वी आणि अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा काळ साधारणपणे सतराव्या शतकातील आहे. ते केवळ अध्यात्मिक गुरू नव्हते, तर एक महान समाजसुधारक, संघटक आणि राष्ट्रप्रेमी संत होते.



## जन्म आणि बालपण

**पूर्ण नाव :** नारायण सूर्याजीपंत ठोसर.

**जन्म :** चैत्र शुद्ध नवमी (राम नवमी), शके १५३० (सन १६०८) रोजी जालना जिल्ह्यातील जाम गावी झाला.

**विवाहातून पलायन :** लग्नाचे अक्षता पडण्यापूर्वीच 'सावधान' शब्द ऐकताच ते बोहल्यावरून पळून गेले. त्यांना संसारापेक्षा लोककल्याणाची ओढ जास्त होती.

**१२ वर्षांची तपश्चर्या :** नाशिकजवळील टाकळी येथे त्यांनी सलग १२ वर्षे कठोर तपश्चर्या केली. त्यांनी दररोज पहाटे गोदावरी नदीत उभे राहून १३ कोटी वेळा 'श्री राम जय राम जय जय राम' या मंत्राचा जप केला. त्यांनी सूर्योदयकाळी १२० सूर्यनमस्कार घालण्याचा परिपाठ ठेवला होता, जो आजही आरोग्यासाठी आदर्श मानला जातो.

**प्रमुख ग्रंथसंपदा :** समर्थांनी विपुल लेखन केले आहे. त्यांचे साहित्य आजही मार्गदर्शक ठरते.

**दासबोध :** हा त्यांचा मुख्य ग्रंथ. यात प्रपंच आणि परमार्थ यांचा सुरेख संगम घातला आहे.

**करुणाष्टके :** देवाची आर्त हाक मारणारी पदे.

**आत्माराम :** आध्यात्मिक ज्ञानावर आधारित ग्रंथ.

**११ मारुतींची स्थापना :** तरुणांनी शक्तिशाली व्हावे यासाठी जागोजागी हनुमानजींची मंदिरे उभारली.

**मठ परंपरा :** संपूर्ण भारतात मठांचे जाळे निर्माण केले. जेणेकरून स्वराज्यासाठी गुप्तहेर यंत्रणा आणि समाजप्रबोधन दोन्ही साध्य होईल.

**छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ :** समर्थ श्री रामदास स्वामी हे महाराजांचे आध्यात्मिक गुरू होते. त्यांनी शिवरायांना 'निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू' अशा शब्दांत गौरवले. स्वराज्यासाठी लागणारे नैतिक आणि मानसिक बळ समर्थांच्या विचारांतून मिळत असे.

**समर्थांची काही महत्त्वाची शिकवण : प्रयत्नवाद :** 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे.'

**सामाजिक जाणीव :** 'बुद्धी वैभव सांडावे, लोकी लोकी मिसळावे' (लोकांत मिसळून कार्य करा).

**स्वच्छता:**

समर्थांनी त्या काळातही "सावधान आणि स्वच्छ" राहण्याचा संदेश दिला होता.

## दासनवमी महत्त्व

समर्थ श्री रामदास स्वामी हे छत्रपती शिवाजी महाराजांचे आध्यात्मिक गुरू मानले जातात. त्यांनी समाजाला 'बलोपासना' आणि 'भक्ती' यांचा संगम शिकवला. त्यांनी 'दासबोध' या ग्रंथाद्वारे प्रपंचासह परमार्थ कसा साधावा, याचे मार्गदर्शन केले. समाज संघटित करण्यासाठी त्यांनी गावोगावी हनुमानजींची मंदिरे स्थापन केली.

दासनवमी हा दिवस त्यांच्या विचारांचे स्मरण करण्याचा आणि जीवनात शिस्त आणण्याचा दिवस मानला जातो.

## दासनवमी कशी साजरी केली जाते?

हा उत्सव मुख्यत्वे सज्जनगड (सातारा) येथे मोठ्या उत्साहात साजरा होतो. पण महाराष्ट्रात आणि इतर राज्यांत देखील रामदासांचे भक्त या प्रकारे समारंभ आयोजित करतात.

**ग्रंथराज दासबोध वाचन :** अनेक ठिकाणी दासबोधाचे सामूहिक पारायण केले जाते.

**प्रभात फेऱ्या :** सकाळी लवकर श्रीरामनामाचा जप करत प्रभात फेऱ्या काढल्या जातात.

**रामरक्षा आणि मारुती स्तोत्र :** हनुमानजींची मंदिरे आणि मठांमध्ये स्तोत्र पठण होते.

**कीर्तन आणि प्रवचन :** समर्थांच्या जीवनावर आणि त्यांच्या साहित्यावर आधारित कीर्तने आयोजित केली जातात.

**अन्नदान :** दासनवमीच्या दिवशी अनेक घरांमध्ये 'नैवेद्याचा बेत' हा समर्थांना प्रिय असलेल्या पदार्थांचा असतो. ज्यामध्ये प्रामुख्याने बाजरीची भाकरी, पिठले, गव्हाची किंवा करड खीर आणि मेथीची भाजी यांचा समावेश असतो.

**जय जय रघुवीर समर्थ :** हा समर्थांचा विजयमंत्र दिवसभर जपला जातो.

# जगायचा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नऊ दिवसांचा उत्सव. या उत्सवात अनेक सुख शिखरे असतात. ही शिखरे अनुभवायची म्हणजे साक्षात गुरुकृपा. हे अनुभव घ्यायचे असतील हा उत्सव पाहायचाच नाही तर जगायचा. रोजच्या तेरा प्रदक्षिणांची आवर्तने झाली की सगळेजण रामरायांसमोर उभे राहतात. दासमारुतींना पाठीशी ठेवून रामरायांकडे एकाग्र बघायचा तो क्षण. ही प्रार्थना ज्या आर्जवी चालीत म्हटली जाते ती चाल इतकी मधुर, हळवी आणि मातृमनाची आहे, की जाणवून घेणाऱ्याचे डोळे नकळत पाणावले जातात. यापुढचे शब्द ऐकू येतात ते मागणे आहे. जगनियंत्याकडे अनेक भक्तांची ही हाक.

**'कल्याण मागणे रामा तुज'**

(पहिली ओळ)

उत्सव संपत आलाय..

गेले नऊ दिवस आळवतोय..

रामराया, कल्याण मागतोय..

स्वानुभूतीतून मिळणारे कल्याण ससुक्त असते.

हे पसायदान प्रत्यक्ष समर्थांनी मागितले.

त्यांच्या मुखातला हा रामगजर..

कल्याण स्वतःसाठी मागायच.. पण ते कल्याण, ते शुभांकित आयुष्य रामस्पर्शाने पावन होत चाललेले..!

**'तुम्ही जगज्जीवन..तुम्ही मनमोहन..'**

संपूर्ण शरण..!

तुमचे आमच्यावरचे प्रभुत्व आम्ही मान्य करतोय. आमचे पूर्ण आयुष्य तुम्ही सुसंकृत करून अतिशय मोहक करून दिलेल आहेस..!

**'कोण आहे तुजवीण..?'**

इतका आमूलाग्र बदल करून देणारे ईश्वर तुम्हीच आहात. तुम्ही त्राता, तुम्ही सुखकर्ता आहात..!

तुमच्याशिवाय सुखाची वाट करून देणारे दुसरे कोण आहेत..

**'आम्ही हरिजन, तुम्ही जन पावन'**

आमचे आयुष्य हे तुमच्याच अंकित आहे. तुमच्यात संपणारे आहे.

ज्याच्यातून उत्पत्ती त्याच्यातच समर्पण हा पूर्ण आयुष्याचा गोषवारा. वेगळे असे काहीच नाही. आम्ही तुमच्याच भक्तीने लिप्त. आणि ती ही भक्ती इतकी पावन आहे की तुमच्याजवळ अस्तित्वाने आमच्या आयुष्यातील सारी वैगुण्ये निरसन होऊ लागली आहेत.

**'बोलती वेद पुराणे'**

ही सारी गुरुमुखातली वाणी आहेच. पण सनातन वेदशास्त्रांनी सुद्धा या तुझ्यातल्या एकात्मता आणि भक्तीची वारंवार स्तुती केली आहे.

**'भक्त सुखी ठेवा, राव सुखी होईल'**

रामराया, गेल्या नऊ दिवसांचा उत्सव तुमचा आहे. तुमची अपरंपार भक्ती आणि अतुल्य महती याचा जोहार आम्ही केला.

आम्हा भक्तांची लाज राखा. आम्हाला आत्मिक सुखी ठेवा. संकटाशी झुंजायची आणि तरीही आयुष्यात प्रामाणिक राहायची उर्मी आम्हाला द्या.

**ते सुख द्या..!**

समाजातला प्रत्येक घटक सुखी असू द्या..!

आर्थिक श्रीमंत असतील ते आध्यात्मिक रीत्या उदंड होऊ द्या..!!

**'दास म्हणे मज देणे'**

रघुराजा... एक भक्त, याचक म्हणून आम्ही तुमच्याकडे ही पावन भिक्षा मागतोय. मला एवढेच द्या. हेच मागणे पूर्ण होणे हेच या उत्सवाचे फलित.

रामराया तुमच्या उत्सवात तुमच्याबरोबर राहून तुमची भक्ती करून स्वतः रामरंगाचा गुलाल माथी लावणे ही दासवमीची तुमच्याकडून आमच्या झोळीत भिक्षा.

**रामराया येतो आता..!**


# श्रेष्ठ योगी : गोपालदास महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गोपालदास महाराज यांच्याविषयी जास्त काहीच माहिती उपलब्ध नाही. त्यांच्याबद्दलही काही माहिती कोठेच सापडत नाही. नाशिक येथे गोदावरीच्या काठावरील भाटे यांच्या धर्मशाळेमागे अळवाची मोठी खाच होती. त्या खाचेतील चिखलात गोपालदास रात्रंदिवस पडलेले असत. त्या वेळेस लोकांना हे श्रेष्ठ योगी आहेत ही कल्पना नव्हती. तरीही लोक त्यांना चिखलातून बाहेर काढीत असत. परंतु ते परत चिखलात जाऊन पडत राहत. असा प्रकार खूप दिवस चालला होता. ते काही खात- पीत नसत व त्यांचा कोणत्याही प्रकारे कोणास त्रास नसे. त्यांना देहभान नव्हते व चिखलात पडलेले असत. कधी त्यांच्या अंगाभोवती सर्प वेटोळे घालून बसलेले असत. यामुळे लोक घाबरून त्यांच्या जवळ जात नसत. असे ३ वर्षे ते चिखलात पडून होते. त्यांचे श्रेष्ठत्व व हे सामान्य माणसांचे काम नाही हे लोकांना कळायला लागले होते. शेवटी नांदगावकर, दत्तोपंत चाफेकर व इतर काही लोकांनी त्यांना तेथून काढून काळाराम मंदिरात आणायचा निश्चय केला. ठरल्याप्रमाणे सर्वांनी त्यांना त्या चिखलातून बाहेर काढले, गोदावरीच्या पाण्यानी त्यांना स्नान घातले व काळाराम मंदिरातील ओवरीत आणले. ते तेथे जे उभे राहिले ते तब्बल दीड वर्षे तसेच उभे राहिले. भक्तजन त्यांना नैवेद्य आणून देत. पण त्याचा काही उपयोग होत नसे. कारण ते काही खात-पीत नसत. एवढेच काय पण त्याकडे बघतही नसत. कोणी तोंडात घास घातल्यास ते तो थुंकून टाकत किंवा थोडासाच खात. दीड वर्षानंतर त्यांनी मंदिराच्या ओवरीतच बैठक मारली व धुनी ठेवली.

**ऐकिले भक्तांचे वचन। गोपाळे केले आसन।**
**पेटविले धुनी साधन। निज सन्मुख।**
**सदा राहे अफाट वृत्ती। दिगंबर नग्न मूर्ती।**
**परी कोणाही कष्ट। न देती योगेश्वर।**
**सर्व तेथेच करती विधी। परी न सुटे दुर्गंधी।**
**जे स्वयेंचि असे सुगन्धी। तेथे घाण केवी येई।**

गोपाळदासांचे इष्ट दैवत नृसिंह होते व ते सतत याच नावाचा मंत्रोच्चार करीत असत. त्यामुळे लोक त्यांना नरसिंह महाराज म्हणत. या नावानेच ते नाशिकमध्ये ओळखले जातात. त्यांच्या ध्यान देवतेचे अधिष्ठान ते जेथे बसत असत तेथील खांबातच त्यांनी निश्चित केले होते व ते त्या खांबास कोणास स्पर्शही करून देत नसत. यांना एक सवय होती ती म्हणजे गांजा ओढण्याची. पण हे व्यसन नव्हते व ते त्याच्या आधीन नव्हते. याबद्दल ते म्हणत 'ये तो माप मापना है' नंतर ते थोडे थोडे बोलू लागले. पण ते बोलणे सर्वांसाठी नसून ठराविक भक्तांसाठी असे. विशेष व्यक्तींशी ते रात्री बाराचे पुढे वेदांत धर्म इत्यादी विषयांवर चर्चा करत तेव्हा त्यांच्या ज्ञानाची लोकांना कल्पना येई. श्री माधवनाथ महाराज, श्री रामानंद बीडकर महाराज व साई चरित्र इत्यादी संतांच्या चरित्रात गोपालदासांचा उल्लेख आहे. तसेच गजानन विजयग्रंथातही त्यांचा उल्लेख आहे.



श्री साई चरित्रात ३३ व्या अध्यायात अशी गोष्ट आहे, की कर्णिक नावाचा डहाणू येथील एक भक्त गुरुपौर्णिमा सन १९१७ रोजी शिर्डीस गेला. श्री साई बाबांचे दर्शन घेऊन तो बाहेर पडला. तेव्हा त्याच्या मनात आले की आणखी एक रुपया बाबांना अर्पण करावा. तो न करता तो भक्त आपल्या घरी डहाणू येथे जाताना नाशिकला काळाराम मंदिरात गेला व गोपालदास महाराजांचे दर्शन घेताच महाराज म्हणाले, की माझा राहिलेला रुपया दे. अशा रीतीने श्री साई बाबांनी तो रुपया घेऊन भक्ताची इच्छा पूर्ण केली. यावरून हे कळते की सर्व संतांचा आपापसांत कसा संवाद होता.

**वाटले आणिक एक रुपया। वरती जाऊन बाबांशी द्यावा।**
**तोच तो विचार लागला त्यागावा। रुपया ठेवावा तैसाच।**
**ज्या गृहस्थे आज्ञा देवविली। त्यानेच वरून खूण केली।**
**आता एकदा आज्ञा जाहली। पुढील पाऊली मार्गक्रमा।**
**विश्वास ठेऊनिया सांकेति। कर्णिक तैसेचि पुढे निघती।**
**उतरते झाले नाशिकवरती। मित्रसामवेति मार्गात।**
**काळ्यारामाचे देवळात। कर्णिक जाती दर्शनास।**
**नरसिंगमहाराज संत। दर्शन अवचित जाहले।**
**भक्तपरिवार असता भोवती। महाराज अकस्मात उठती।**
**कर्णिकांस मणिबंधी धरिती। रुपया म्हणती दे माझा।**
**– साई चरित्र अध्याय ३३**

एकदा श्री माधवनाथ महाराज श्री गोपालदास महंतांकडे गेले. तेथे गेल्यावर त्यांनी त्यांच्याकडे पाहून आपले दंड थोपटले. ते पाहून गोपालदासांनी आपल्या मांडीवर थाप मारली. त्यावर माधवनाथांनी तोंडाशी हात घेऊन मोठा ध्वनी केला. तसेच गोपालदासांनीही केले. अशा खुणा सामान्य माणसांच्या बुद्धीला समजणे शक्यच नाही ते फक्त संतच जाणतात. याचे वर्णन श्री माधवनाथ महाराज चरित्रात केले आहे.

**नाथ येता देखे दुरून। केले परमहंस हास्यवदन।**
**हसतचि उभा राहून। मांडीवरी थाप ठोकली।**
**नाथे ठोकिले निजदंड। केले एक निनाद।**
**गोपालानेही तैसा स्वरभेद। केला निजमुखे।**
**झाला हाचि संवाद। हेचि या संतांचे शब्द।**
**ह्याचा अर्थ बहू गोड। संतचि जाणती।**
**– श्री माधवनाथ चरित्र**

साकोरी येथील हंसराज नावाचा एक भक्त दम्याच्या विकारांनी हैराण झाला होता व निपुत्रिक पण होता. तो महाराजांच्या दर्शनास काळाराम मंदिरात गेला तेव्हा महाराज म्हणाले, की तुला बाधा आहे व त्यासाठी तू शिर्डी येथे जा. श्री साई बाबा तुला दोन थोबाडीत मारतील व तुझे काम होईल. त्याप्रमाने हंसराज हे १९१६ मध्ये शिर्डीस गेले. श्री बाबास नमस्कार करताच श्री बाबानी यास दोन थोबाडीत मारल्या व भूतास म्हणाले निघून जा. त्या दिवसापासून हंसराज यांचा दमा कायमचा बरा झाला व त्यास यथावकाश पुत्रलाभ झाला.

## श्री गोपालदास महंत महाराज समाधी, नाशिक

तात्यासाहेब वाणवळे यांना होशंगाबाद येथे त्यांच्या मुलीच्या घरी गोपालदास महाराजांना घेऊन जाण्याची इच्छा झाली. त्यांना नातू झाला होता व मुलीस महाराजांच्या दर्शनाची इच्छा झाली. पण गोपालदासांनी जाण्याचे नाकारले. शेवटी श्री माधवनाथांना मध्यस्थी घातले व दोन माणसे गोपालदास महाराजांना आणावयास गेली. त्यांना पाहून महाराजांनी उग्र रूप धारण केले व म्हणाले, की 'नरसिंह अपना आसन छोडकर नही जाते. चले जाव. नही तो दंडा मिलेगा' तेव्हा ती दोन माणसे पळून गेली. मग श्री माधवनाथांनी परत मध्यस्ती केली व निरोप पाठवला 'आपके भाई कहते है नर्मदा माता बुलाती है' मग आपली फाटकी गोधडी घेऊन व विजार घालून ते टांग्यात बसले.

श्री गोपालदास तसे नग्नच असत. पण बाहेर जाताना तसे जात नसत. ते शांतवृत्तीने रेल्वेत बसले व मध्ये जळगाव येथे कर्डीले मामलेदार यांच्याकडे उतरले. तेथे जाताच अत्यंत घाणेरड्या नाल्याचे पाणी पिऊन ते पिशाच्च लीला करू लागले. त्यांना आणण्यास जे लोक गेले त्यांना पण पाण्याचा प्रसाद मिळाला पण ते पाणी नर्मदा जलसारखे गोड लागले. श्री माधवनाथ महाराज व गोपालदास यांच्या भेटीचे बरेच उल्लेख सापडतात. परंतु त्यांच्या बोलण्याची सांकेतिक भाषा इतरांना समजत नसे.

श्री बीडकर महाराज हे नाशिक येथे सून १९०८ मध्ये काळाराम मंदिरासमोरील दत्त मंदिरात ६ महिने राहिले होते. हे १०७ वर्षे जुने दत्त मंदिर पंचवटीत काळाराम मंदिरासमोर आहे व श्री बीडकर महाराजांनीच स्थापन केले आहे. जेव्हा श्री बीडकर महाराजांचे भक्त गोपालदासांच्या दर्शनास गेले तेव्हा ते म्हणाले, की सोने येथून तेथून सर्व सारखेच असते. अशा रीतीने गोपालदासांनी सांगितले, की सर्व संत सारखेच असतात. त्याची पडताळणी नको. श्री गजानन विजय ११ व्या अध्यायात श्री गजानन महाराज व गोपालदास यांच्या भेटीचा उल्लेख असा वर्णन केला आहे.

**वंदिली माय निलंबिका। तेवी गहनीनाथ देखा।**
**तेथुनि झाले नाशिका। गोपालदास भेटावया।**
**हा गोपालदास महंत। काळ्यारामाच्या मंदिरात।**
**धुनी लावूनी दारात। पंचवटीच्या दारात बसला असे।**
**राम मंदिरासमोर एक। होता पिंपळाचा पार।**
**शिष्यासहित साधूवर। तेथे जाऊनि बैसलें।**
**गोपाळदासांस आनंद झाला। बोलले जवळच्या मंडळींना।**
**आज माझा बंधू आला। वऱ्हाडातून गजानन।**

गोपालदास महंत हे फार उच्च कोटीतील संत होते. त्यांनी नाशिक येथे शुक्रवार माघ वद्य नवमी शके १८४१ रोजी आपले अवतार कार्य संपविले. श्री गोपालदास महाराजांची समाधी पंचवटी येथे गोदावरी नदीकाठी आहे. श्री महाराज ज्या ओवरीत दीड वर्षे उभे होते व नंतर धुनी लावून होते ती ओवरी काळाराम मंदिरात प्रवेश करताच उजव्या हातास आहे. येथे श्री महाराजांचा फोटो ठेवला आहे. याच ठिकाणी पूर्वीच्या चरण पादुकांचे छोट्या मूर्ती मंदिराचे जीर्णोद्धार कै. मदनबुवा रघुनाथ पुजारी यांनी केला.

महाराजांचे परमभक्त ठाणे निवासी (हल्ली मुक्काम बेल्जियम) श्री सचिन पालये यांच्या घराकडे महाराजांच्या मूळ पादुका असून त्याचे प्रतिवार्षिक पादुका अभिषेक-पूजन-आरती-नैवेद्य गेल्या ३० वर्षांपासून स्व. कृष्णाजी दत्तात्रय पूजाधिकारी यांचे परिवाराकडे असतो. महाराजांचा भक्त परिवार खूपच मोठा आहे.




(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)